# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# औरंगाबाद परिमंडल, औरंगाबाद.

## प्रकरण क्र. सीजीआरएफ/एझेड/शहर/६०४/२०१६/३५

**(नोदंणी क्रमांक २०१६१२०००९)**

तक्रार दाखल दिनांक :- ०३.१२.२०१६
निकाल दिनांक :- १७.०१.२०१७

श्री. संदिप चक्रधर मेहेरे, तक्रारदार
प्लॉट नं. ५२, एस नं. १२५,
एफ सेक्टर, सिडको, शिवाजी नगर,
औरंगाबाद ४३१ ००५.
(ग्राहक क्रमांक ४९००१२७४१८०१)

## विरुध्द

कार्यकारी अभियंता (प्रशासन), गैरअर्जदार
नोडल ऑफिसर,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म .
शहर मंडल, औरंगाबाद.

## मंच

१ ) डॉ.भास्कर पालवे अध्यक्ष
२ ) श्री. उत्तम.म.उरकुडे सदस्य / सचिव
३ ) श्री. वि. सु काबरा सदस्य

# ग्राहक गा-हाणे निवारण मंच -निर्णय

अर्जदार श्री. संदिप चक्रधर मेहेरे हे गैरअर्जदार कार्यकारी अभियंता, (नोडल ऑफिसर), महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांचे ग्राहक असून त्यांचा ग्राहक क्रमांक ४९००१२७४१८०१ असा आहे. अर्जदाराने दिनांक ०३.१२.२०१६ रोजी महाराष्ट्र विदयुत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ यातील परिशिष्ट -अ मध्ये गैरअर्जदार यांचेविरुध्द तक्रार नोंदविली आहे. तक्रारीचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे आहे.

ग्राहकाचे विद्युत जोडणी पुर्वी अंडरग्राऊंड केबल टाकण्यात आली होती. परंतु सदरहू केबल खराब झाल्यामुळे गैरअर्जदाराने ओव्हरहेड केबल टाकुन विद्युत पुरवठा पुन्हा पुर्ववत चालु करुन दिला. सदर ओव्हरहेड केबल सुरक्षिततेच्या दृष्टीने धोक्याची असल्यामुळे व वारंवार वीज पुरवठा खंडीत होत असल्याने सदरहू केबल पुर्वीप्रमाणे अंडरग्राऊंड टाकण्यात यावी अशी विनंती गैरअर्जदारास दिनांक १४.१२.२०१५ पासून करण्यात आली. परंतु अद्यापि गैरअर्जदाराने सदरहू काम केलेले नाही.

**<u>कार्यकारी अभियंता (प्रशासन), नोडल ऑफिसर, महावितरण, शहर मंडल, औरंगाबाद यांच म्हणणे.</u>**

१) अर्जदार यांचा विद्युत पुरवठा दिनांक ३०.०४.२०११ रोजी मे. जीटीएल कंपनीद्वारे १.३ टक्के सुपरव्हिजन स्किम अंतर्गत झालेले आहे. सदर जोडणी हे मिनीपिलर पासून ते ग्राहकापर्यंत अंडरग्राऊंड केबलद्वारे खाजगी ठेकेदाराकडुन करण्यात आलेले आहे.

२) सदर अंडरग्राऊंड केबल तीन वेळा जळाली असता त्यावेळी मे. जीटीएल कंपनीकडुन जॉयटिंग किटद्वारे जोडण्यात आली होती. नंतर अंडरग्राऊंड केबल पुर्णपणे निकृष्ट झाल्याने मे. जीटीएल कंपनीने सदर केबल ओव्हरहेड टाकुन ग्राहकास विद्युत पुरवठा सुरु करुन दिला आहे.

३) ग्राहकाची तक्रार ही सदर केबल ओव्हर हेड काढुन ती अंडर ग्राऊंड व मिनीपिलरद्वारे करण्यात यावी अशी आहे. परंतु सध्या गारखेडा उपविभागाच्या स्टोअरला सदरचे साहित्य उपलब्ध नाही. तशी विभागीय कार्यालयास मागणी करण्यात आली आहे. तसेच IPDS स्कीम मध्ये केबल टाकण्याचे काम प्रस्तावित करण्यात आले आहे. IPDS स्कीमचे काम चालु झाल्यास केबल बदलुन देण्यात येईल.

**ग्राहक गा-हाणे निवारण मंचाचे निष्कर्ष**

अर्जदार, गैरअर्जदार यांनी सादर केलेल्या म्हणण्यानुसार पुर्वी ग्राहकाचा विद्युत पूरवठा अंडर ग्राऊंड केबलद्बारे मिनीपिलर मार्फत करण्यात आलेला होता. परंतु सदरहू अंडर ग्राऊंड केबल निकृष्ट झाल्याने सदरहू विद्युत पुरवठा ओव्हर हेड केबलद्वारे सुरु करण्यात आलेला आहे व त्यामुळे ग्राहकाचा वीज पुरवठा वारंवार खंडीत होत आहे व ग्राहकास त्रास होत आहे. सबब सदरहू विद्युत पुरवठा अंडर ग्राऊंड केबल व मिनीपिलरद्वारे देणे आवश्यक आहे

वरील वस्तुस्थितीचा विचार करता मंच खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

# आदेश

१) अर्जदाराची तक्रार मान्य करण्यात येत आहे.

२) गैरअर्जदाराने ग्राहकाचा विद्युत पुरवठा मिनीपिलर मार्फत अंडर ग्राऊंड केबलद्वारे पुर्ववत करावा.

२) केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल ३० दिवसात सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| स्वाक्षरीत | स्वाक्षरीत | स्वाक्षरीत |
| डॉ.भास्कर गो.पालवे | उत्तम.म.उरकुडे | विलासचंद्र.सु.काबरा |
| अध्यक्ष | सदस्य/सचिव | सदस्य/सचिव |